# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**आस्थापना विभाग**

**एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५**

**फोन नंबर ०७१३२-२१६५९२**

जावक क्रमांक : गों.वि./आस्था/561 /२०१७ — दिनांक :- .०२.२०१७ 4.3.2017

## परिपत्रक

**विषय : अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत नियम व नियमन २०११**
आपल्या विश्वविद्यालयातील तसेच आपल्या विश्वविद्यालयातील संलग्न महाविद्यालयातील कॅन्टीन/मेस साठी परवाने घेण्यास बाध्य करणेबाबत.

संदर्भ : १) मा. मि. श. देशपांडे, पदावधित अधिकारी तथा सहायक आयुक्त(अन्न), अन्न व औषध प्रशासन(म.रा.), नागपूर यांचे पत्र क्र. असुमाका/कॅन्टीनपरवाना/१५१५/२०१७/०३, दि. ३०/०१/२०१७
२) मा. संचालक, अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांचे पत्र दिनांक ०४/११/२०१६

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, संदर्भीय पत्र क्र. १ व २ नुसार अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत नियम व नियमन २०११, च्या अधिनियमातील कलम ३१(१) सहवाचन अन्न सुरक्षा व मानदे(अन्न व्यवसायिकांचे परवाने व नोंदणी) नियमन २०११ मधील नियमन क्र. २.१.२ नुसार प्रत्येक अन्न व्यवसायिकाने अन्न व्यवसाय सुरु करण्याआधी विषयांकीत अधिनियमांतर्गत परवाना घेणे बंधनकारक असुन विना परवाना व्यवसाय करणे हा गुन्हा असून विषयांकित कायदयाचे कलम ६३ नुसार त्यासाठी दंड व शिक्षेची तरतुद आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे अर्धशासकीय पत्र दि.२७/१२/२०१६ रोजीचे अवलोकन करून विद्यापीठ व विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांमध्ये कॅन्टीन/मेस चालविण्यासाठी विषयांकित अधिनियमांतर्गत परवाना घेण्याचे निर्देश देण्यात आलेले असल्याने विद्यापीठ परिसरातील तसेच संलग्न सर्व महाविद्यालयातील कॅन्टीन/मेस या व्यवसायाकरीता विषयांकीत अधिनियमांतर्गत परवाना घेण्यांत आलेला आहे किंवा नाही याबाबत खातरजमा करावी तसेच परवाना नसल्यास त्वरीत परवाना घेण्यासाठी बाध्य करण्यात आल्याने आपल्यास्तरावर संदर्भीय पत्रान्वये कार्यवाही घेण्यात यावी.

( दिपक एस. जुनघरे)
कुलसचिव(का.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र - उपरोक्तप्रमाणे.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरुंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

E:\LATTER\Circular/167